महाराष्ट्र शासन

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, कळमनुरी**

Tel No - (02455) Off. 230121 email id sdokalamnuri@gmail.com

**वाचा** :- 1. मा. जिल्हाधिकारी हिंगोली यांचे पत्र जा.क्र. 2026/आरबीडेस्क-1/पोल-2/पो.पा.भरती/ कावी दिनांक 09.02.2026.
2. याकार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र./उविअ/आस्था/पो.पा./कावी दिनांक 10.02.2026.

---

जा.क्र. 2026/ आस्था/पो.पा./मुलाखत / कावी -79 दिनांक :- 11 फेब्रुवारी 2026.

**विषय:- पोलीस पाटील भरती-2026 लेखी परीक्षेत पात्र उमेदवारांची मुलाखत बाबत.**

ज्याअर्थी, हिंगोली जिल्हाच्या ठिकाणी दिनांक 08.02.2026 रोजी पोलीस पाटील पदाकरीता लेखी परिक्षा घेण्यात आली असून संदर्भ क्रमांक 02 नुसार कळमनुरी उपविभागातील पोलीस पाटील पदभरती- 2026 करीता लेखी परीक्षेत पात्र असलेल्या उमेदवारांची अ.क्रमांक व परिक्षा क्रमांक निहाय यादी https://hingolipp.recruitonline.in/ या संकेतस्थावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

त्याअर्थी, पोलीस पाटील पदाकरीता पात्र उमेदवारांची मुलाखत **दिनांक 12.02.2026 ते 20.02.2026 या कालावधीत मा. जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे सकाळी 10.00 वा.** घेण्यात येत आहे. सदरील मुलाखतीस पात्र उमेदवारांना नेमुन दिलेल्या दिनांकास वेळेवर नियोजित ठिकाणी मुळ कागदपत्रे व आवेदन पत्राची छायांकित प्रतीसह हजर राहावे.

| अ.क्र. | मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी अनुक्रमांक | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 01 | 001 ते 094 | 12.02.2026 | सकाळी 10.00 ते संध्याकाळी 6.00 वा. |
| 02 | 095 ते 189 | 13.02.2026 | सकाळी 10.00 ते संध्याकाळी 6.00 वा. |
| 03 | 190 ते 284 | 16.02.2026 | सकाळी 10.00 ते संध्याकाळी 6.00 वा. |
| 04 | 285 ते 379 | 17.02.2026 | सकाळी 10.00 ते संध्याकाळी 6.00 वा. |
| 05 | 380 ते 474 | 18.02.2026 | सकाळी 10.00 ते संध्याकाळी 6.00 वा. |
| 06 | 475 ते 564 | 20.02.2026 | सकाळी 10.00 ते संध्याकाळी 6.00 वा. |

उमेदवारांनी ऑनलाईन प्रणालीवर सादर केलेल्या कागदपत्रा आधारे त्यांना मुलाखतीकरीता पात्र ठरविण्यात आले असुन उमेदवाराने त्यांचेकडील सर्व मुळ कागदपत्रे व त्या कागदपत्रांचे 02 छायांकित प्रतीवर स्वसाक्षांकित प्रती मुलाखतीच्या वेळी सादर करणे बंधनकारक आहे. वेळेअभावी सदर कागदपत्राची प्राथमिक तपासणी करण्यात येत असुन मुळ कागदपत्राच्या अंतीम तपासणीस अधिन राहुन मुलाखतीस बोलविण्यात येत आहे. मुळ अर्हता धारण करणारे कागदपत्र आढळुन न आल्यास मुलाखतीनंतर सुध्दा अपात्र ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

Bhute

**(प्रतिक्षा भुते)**
**उपविभागीय दंडाधिकारी,**
**कळमनुरी**